(62) 4/3

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

उप आयुक्त/ आ.व्य./~~ओडी~~/2046 दिनांक 21/09/2018

**परिपत्रक**

विषय – बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व उद्याने/ मैदाने/ मनोरंजन मैदाने नागरिकांना खुली ठेवण्याच्या वेळेत बदल करून त्यात सुसूत्रता आणण्याबाबत

नागरिकांना खेळण्यासाठी व मनोरंजनासाठी जास्तीत जास्त मोकळ्या जागा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने बृहन्मुबई महानगरपालिकेच्या उद्यान खात्याने उद्याने/ मैदाने /मनोरंजन मैदाने याकरिता आरक्षित असलेले बहुतांश भूभाग तसेच मोकळ्या जागा उद्याने / मैदाने /मनोरंजन मैदाने म्हणून विकसित केल्या आहेत.

असे निदर्शनास आले आहे की सदर जागा नागरिकांसाठी निर्धारित काळासाठी खुल्या असतात. परंतु उद्याने /मैदाने/ मनोरंजन मैदाने नागरिकांना खुल्या असण्याच्या वेळा भिन्न आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व उद्याने/ मैदाने/ मनोरंजन मैदाने नागरिकांना खुली ठेवण्याच्या वेळेत सुसूत्रता आणण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेची सर्व उद्याने/ मैदाने/ मनोरंजन मैदाने खाली नमूद केलेल्या वेळेत नागरिकांसाठी खुली ठेवण्याचे निर्देश देण्यात येत आहेत

सकाळी ०६.०० ते दुपारी १२.००

दुपारी ०३.०० ते रात्रौ ०९.००

विशिष्ट उद्यान/ मैदान/ मनोरंजन मैदान खुले ठेवण्याच्या वेळेत काही बदल करावयाचा असल्यास संबंधित सहाय्यक आयुक्त न्याय्य कारणास्तव संबंधित अतिरिक्त आयुक्त यांच्या मंजुरीने बदल करू शकतील.

उद्याने /मैदाने/ मनोरंजन मैदाने नागरिकांना खुली असण्याच्या वेळेतील बदल दर्शविणारे फलक उद्याने /मैदाने/ मनोरंजन मैदाने यांच्या दर्शनी भागावर लावण्यात यावेत. उद्याने /मैदाने/ मनोरंजन मैदाने ज्या वेळेत नागरिकांसाठी खुली असतील त्या कालावधीत पुरेशी सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात यावी.

नागरीकांच्या माहितीसाठी बदललेल्या वेळा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात याव्यात.

(स्वाक्षरी) उद्यान अधीक्षक

(स्वाक्षरी) उप आयुक्त (आ.व्य.)
21/9/18